

महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक

समर्थ

# गांवकरी




POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026

रविवार, दि. १५ फेब्रुवारी २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे | नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : ०८६ | किंमत : ४ रूपये


Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com

## सुनेत्रा पवार झिरवाळ यांच्या पाठिशी

### कोअर कमिटीची सोमवारी बोलावली बैठक; झिरवाळ लाचखोरीमुळे संकटात



**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा सत्ताधारी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सुनेत्रा अजित पवार यांनी कार्यालयातील लिपिकाच्या लाचखोरीमुळे अडचणीत सापडलेल्या मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या पाठिशी उभे राहण्याचे संकेत दिलेत. या प्रकरणी चर्चा करण्यासाठी त्यांनी सोमवारी सायंकाळी पक्षाच्या कोअर कमिटीची बैठक बोलावली आहे. त्यामुळे या बैठकीत त्या झिरवाळ यांच्यासह पक्षाच्या ध्येय धोरणांसंदर्भात एखादा ठोस निर्णय घेतील असा अंदाज आहे.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या कार्यालयातील लिपिक राजेंद्र ढेरिंगे याला एसीबीने 50 हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडले आहे. विरोधकांनी या प्रकरणी झिरवाळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली आहे. त्यामुळे ते संकटात सापडलेत. हे प्रकरण समोर आल्यानंतर झिरवाळ यांनी आपला या प्रकरणाशी संबंध आढळला तर आपण राजीनामा देऊ असे स्पष्ट केले आहे. पण शनिवारी सकाळपासूनच ते नॉट रिचेबल झाल्यामुळे त्यांच्यावर असलेला दबाव स्पष्ट झाला आहे. या पार्श्वभूमीवर सुनेत्रा पवार यांनी त्यांच्या पाठिशी उभे राहण्याचे संकेत दिलेत.

यासंबंधीच्या माहितीनुसार, सुनेत्रा पवारांनी सोमवारी सायंकाळी 6 वा. पक्षाच्या कोअर कमिटीची तातडीने बैठक बोलावली आहे. या बैठकीत नरहरी झिरवाळ प्रकरणात नेमके काय झाले? व पुढे काय करता येईल? या प्रश्नांवर सदस्यांची मते जाणून घेणार आहेत. प्रस्तुत बैठकीत पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षांच्या निवडीसाठी राष्ट्रीय कार्यकारीणीच्या बैठकीवरही चर्चा होणार आहे. पुढील 15 दिवसांत यासंबंधीच्या प्रक्रियेला सुरुवात होणार आहे असा अंदाज आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे नरहरी झिरवाळ प्रकरणात विरोधकांकडून राष्ट्रवादी काँग्रेसवर जोरदार चिखलफेक सुरू आहे. पण आमदार अमोल मिटकरी वगळता पक्षाच्या एकाही बड्या नेत्याने झिरवाळ यांच्या समर्थनार्थ पुढे येण्याचे धाडस दाखवले नाही. परिणामी, संपूर्ण पक्ष या प्रकरणी बॅकफूटवर गेल्याचे चित्र आहे. त्यामुळे आता पक्षाला या अडचणीतून बाहेर काढण्यासाठी स्वतः सुनेत्रा पवार यांनीच पुढाकार घेतल्याचे चित्र आहे.

नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील लिपिक राजेंद्र ढेरिंगे याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने लाच घेताना रंगेहाथ पकडले होते. या घटनेमुळे राज्याच्या प्रशासकीय व राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे. ढेरिंगे यांनी एका औषध विक्री दुकानदाराचा निलंबित परवाना पुन्हा पूर्ववत करण्यासाठी 50 हजार रुपयांची लाच मागितली होती. त्यापैकी 35 हजार रुपयांची लाच घेताना एसीबीने ते एसीबीच्या जाळ्यात सापडले होते. त्यामुळे या खात्याचे मंत्री असलेल्या नरहरी झिरवाळ यांच्या स्वच्छ प्रतिमेवर संशय व्यक्त केला जात आहे. हे प्रकरण त्यांच्या मंत्रिपदावरही शेकण्याची शक्यता आहे.

#### लाचखोरीवर काय म्हणाले नरहरी झिरवाळ?

प्रस्तुत प्रकरणानंतर नरहरी झिरवाळ यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले होते, या प्रकराला मी कुठेही पाठिशी घालणार नाही. मंत्री, पीए यांच्याशी त्याचा संबंध नाही. त्याचे पूर्वीचे काही गुण होते. त्याबद्दल काही सांगता येत नाही. मुख्यमंत्र्यांनी खूप बारकाईने तपासूनच मंत्रालयाला स्टाफ दिला आहे. त्याची कधीही तक्रार आली नव्हती. पण त्याने काल काय प्रकार केला त्याबाबत सांगता येणार नाही. त्याने जी हिंमत केली आहे, त्यासाठी आता त्याला जबाब द्यावा लागेल. तो सरकारी कर्मचारी आहे. त्याच्यासाठी 50 हजार रुपये फार आहेत असे नाही. पण त्याने अशा करण्याची गरज नव्हती. त्याच्याशी खरेच माझा संबंध सापडला तर मी राजीनामा देईन. त्याच्या चौकशीतून काही माझ्यापर्यंत आले तरी मी राजीनामा देईन.

माझा स्वभाव सर्वांना माहिती आहे. त्यामुळे कुणी टार्गेट करणार नाही. एसीबीने त्याला रंगेहाथ पकडले. त्यामुळे त्याला शिक्षा भोगावीच लागेल. या प्रकरणी पक्षनेतृत्वाशी माझी कोणती चर्चा झाली नाही. माझ्या कार्यालयाच्या भागात हा प्रकार घडल्याने ते बंद करण्यात आले आहे. कार्यालय सील करण्यात आल्याची मला माहिती नाही, असे झिरवाळ यंनी म्हटले होते.

## माहोल तोच, फक्त अजितदादांच्या जागी सुनेत्रावहिनी

**बारामती : (समर्थ गांवकरी)**

स्थळ तेच, गर्दीचा माहोलही अगदी तसाच, त्याच तडफेने जनतेची निवेदने स्वीकारून जागेवरच अधिकाऱ्यांना सूचना देण्याची पद्धतही अगदी तिच...फरक इतकाच होता की दिवंगत अजित पवार यांच्या जागी सुनेत्रा पवार होत्या. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी शनिवारी (ता. १४) बारामतीतील 'सहयोग' या त्यांच्या निवासस्थानी जनता दरबारात नागरिकांची निवेदने स्वीकारत जागेवरच कामे मार्गी लावण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. पती निधनाचे दुःख बाजूला सारून त्यांनी अजित पवार यांची कामे मार्गी लावण्याची सुरुवात केली असल्याचे चित्र दिसले. अजित पवार बारामतीत ज्या प्रमाणे शनिवारी सकाळी निवासस्थानी कार्यकर्त्यांना भेटत असत, अगदी त्याच पद्धतीने सुनेत्रा पवार यांनीही कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्या माळेगाव सहकारी साखर कारखाना, खरेदी विक्री संघ, दूध संघाच्या संचालक मंडळासोबत बैठकीत आढावा घेतला. बारामती, इंदापूर, दौंड व पुरंदर या चार तालुक्यांतील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या विजयी उमेदवारांशीही संवाद साधत त्यांची मते जाणून घेतली. शनिवारी प्रथमच सुनेत्रा पवार यांच्या कामाच्या झपाट्याने वेगळेच वातावरण पाहायला मिळाले. अजितदादांनी जी स्वप्ने पाहिली, त्यांना जे प्रकल्प पूर्ण करायचे होते, त्या दृष्टीने सर्व संस्था व पदाधिकाऱ्यांनी कार्यरत राहावे, असे आवाहन सुनेत्रा पवार यांनी केले.
















महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक
समर्थ गांवकरी



# इंदिरा आयव्हीएफ : नवीन फर्टिलिटी क्लिनिकचे उद्‌घाटन

**पुणे : (समर्थ गांवकरी)**

इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटल लिमिटेडने ४१ सिटी हब, दुसरा मजला, श्री स्वामी समर्थ नगर, गाडीतळ, हडपसर, पुणे येथे आपल्या नवीन फर्टिलिटी क्लिनिकचे उद्‌घाटन पुणे महानगर पालिकाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती पवनीत कौर यांच्या हस्ते करणात आले त्यावेळी नगरसेवक योगेश मुळीक, इंदिरा आयव्हीएफचे झोनल बिझनेस डायरेक्टर डॉ. अमोल लुंकड, डॉ. इशिता लुंकड, हडपसर सेंटर हेड डॉ. ईशा कपूर सह अन्य मान्यवर ही उपस्थित होते.




या नव्या केंद्राच्या सुरूवातीमुळे पुणे आणि परिसरातील नागरिकांना अधिक सुव्यवस्थित, सुरक्षित आणि सुलभ प्रजनन उपचार सुविधा उपलब्ध होणार आहेत. फर्टिलिटी आणि असिस्टेड रिप्रोडक्टिव्ह सर्व्हिसेसच्या सर्व अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज हे केंद्र रुग्णांना स्टॅण्डर्ड क्लिनिकल प्रोटोकॉल, पेशंट सेफ्टी सिस्टीम आणि तंत्रज्ञानाधारित उपचार पद्धतींच्या माध्यमातून पारदर्शक, सुरक्षित आणि स्थिर उपचार सेवा उपलब्ध करून देईल.

मुख्य अतिथी पुणे महानगर पालिकाच्या अतिरिक्त आयुक्त श्रीमती पवनीत कौर म्हणाल्या की ,स्थानिक स्तरावर हेल्थकेअर इन्फ्रास्ट्रक्चर बळकट करणे हा प्रदेशाच्या दीर्घकालीन आरोग्य गरजांचा विचार करता अत्यंत महत्त्वाचा भाग आहे. हडपसरमधील इंदिरा आयव्हीएफची सुरुवात कुटुंबांना संघटित फर्टिलिटी केअर अधिक जवळ आणणारी आहे आणि रिप्रोडक्टिव्ह हेल्थमध्ये योग्य वेळी मिळणाऱ्या सल्ला सेवेच्या महत्त्वावर प्रकाश टाकते

विशेष अतिथी नगरसेवक योगेश मुळीक म्हणाले,स्थानिक स्तरावर आरोग्य सेवांची उपलब्धता हा मजबूत समाज व सक्षम कुटुंबांचा पाया आहे. इंदिरा आयव्हीएफचे नवीन केंद्र फर्टिलिटी अवेअरनेस वाढवण्यासोबतच वेळेवर वैद्यकीय सल्ला घेण्यास योग्य प्रोत्साहन देईल. अशा उपक्रमांमुळे संपूर्ण आरोग्यव्यवस्थेवर सकारात्मक परिणाम होतो.

इंदिरा आयव्हीएफ हॉस्पिटल लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर नितीज मुर्डिया म्हणाले, हडपसरमधील हा विस्तार फर्टिलिटी केअर अधिक सुलभ आणि विश्वासार्ह करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचा एक भाग आहे.

जागरूकता वाढत आहे आणि रुग्ण लवकरच्या टप्प्यातच संगठित मार्गदर्शन शोधत आहेत; अशावेळी अनुभवी वैद्यकीय टीमच्या साहाय्याने एव्हिडन्स बेस्ड उपचार देणे अत्यंत आवश्यक ठरते.

इंदिरा आयव्हीएफ हडपसर सेंटर हेड डॉ. ईशा कपूर म्हणाल्या, आमचे ध्येय असे उपचार वातावरण निर्माण करणे आहे, जिथे वैद्यकीय उपचारासोबतच भावनिक आधारही मिळेल. फर्टिलिटी केअर हा केवळ विज्ञानाचा विषय नाही; यात आत्मीयता आणि सहानुभूती यांचीही तितकीच गरज असते. आमची टीम दोन्ही दृष्टीकोन समोर ठेवून कार्य करेल.

# डॉ. प्रशांत दत्तात्रय भोईटे यांना पीएच.डी.

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यातील इंदिरा गांधी पॉलिटेक्निक, बेलवंडी (शुगर) चे प्राचार्य डॉ. प्रशांत दत्तात्रय भोईटे यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंग विषयात पीएच.डी. पदवी संपादन करत संस्थेच्या शैक्षणिक परंपरेत मानाचा टप्पा गाठला आहे. त्यांनी "शंकूच्या आकाराच्या उष्णता विनिमयकांमधील उष्णता हस्तांतरणाचा तुलनात्मक अभ्यास" या विषयावर सखोल संशोधन करून राजस्थान येथील सनराईज युनिव्हर्सिटीमधून डॉक्टर ऑफ फिलॉसॉफी (Ph.D.) पदवी यशस्वीरित्या प्राप्त केली.



सदर संशोधनात शंकूच्या आकाराच्या उष्णता विनिमयकांची कार्यक्षमता, ऊर्जा बचत आणि कॉम्पॅक्ट डिझाइन यांचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासातून उद्योग क्षेत्रात ऊर्जा बचत, अधिक कार्यक्षमता आणि कमी जागेत बसवता येणारी रचना यांसारखे महत्त्वपूर्ण फायदे अधोरेखित झाले आहेत. तसेच शैक्षणिक क्षेत्रात संशोधन व विकास, प्रयोगशाळा प्रयोग आणि कौशल्यविकासासाठी या तंत्रज्ञानाचा उपयोग होऊ शकतो, असे निष्कर्ष मांडण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांना उष्णता हस्तांतरण विषयाचे सखोल ज्ञान मिळण्यासाठीही हे संशोधन उपयुक्त ठरणार आहे.

या संशोधन कार्यासाठी डॉ. नितेश दीक्षित, डॉ. मिनेश जैन आणि डॉ. विवेक साचान यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच सोनिया गांधी पॉलिटेक्निकचे प्राचार्य अमोल नागवडे यांचे प्रेरणादायी नेतृत्व मिळाले. छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र नागवडे, जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या संचालिका सौ. अनुराधा नागवडे, व्हा. चेअरमन सौ. मेघाताई संदीपराव औटी, सन्माननीय संचालक मंडळ तसेच संस्थेचे निरीक्षक सचिनराव लगड यांनीही सतत मार्गदर्शन व पाठबळ दिले.

प्राचार्य डॉ. भोईटे यांच्या या उल्लेखनीय यशामुळे संस्थेच्या शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात अभिमानाची भर पडली असून विद्यार्थी व सहकारी शिक्षकांसाठी ते प्रेरणास्थान ठरले आहेत. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेच्या वतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून पुढील शैक्षणिक व संशोधन वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

# 14 फेब्रुवारी- फक्त आणि फक्त जागतिक मातृ-पितृ पूजन दिन



**संगमनेर खुर्द : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यातील घुलेवाडी येथे जागतिक मातृ- पितृ पूजन दिवसाच्या निमित्ताने मातृ-पितृ पूजन सोहळा आयोजित करण्यात आला होता. घुलेवाडी परिसरातील ११० आई वडिलांचे पाद्यपूजन आयोजित केले गेले. त्याप्रसंगी "प्रत्येक मनुष्य हा त्याच्या आईवडिलांमुळे घडत असतो. आई वडील आपल्या आयुष्यातील मौल्यवान ठेवा असतो .तो आपण साऱ्यांनी जपला पाहिजे कितीही कामात असो दररोज घरातून बाहेर पडताना आणि कामावरून घरी येताना आपण आपल्या आई-वडिलांशी आवर्जून काही मिनिट का होईना बोलायला हवं. त्यांना आनंद मिळवून द्यायला हवा. आई-वडिलांनीही त्याग भावनेने कौटुंबिक , अध्यात्मिक आनंद घेतल्यास सर्व प्रश्नच मिटू शकतात". असा संदेश आपल्या भावना व्यक्त करताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात व सर्जन डॉक्टर प्रवीणकुमार पानसरे यांनी व्यक्त केल्या .

माता-पिता हयात असतानाच त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण करणे व त्यांची अविरतसेवा करणे हे मृत्यू पश्चात दहावे तेरावे व वर्षश्राद्ध असे मोठे कार्यक्रम करण्यापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे. असे डॉक्टर प्रवीणकुमार पानसरे यांनी सांगितले.

हा उपक्रम मातृ-पितृ पूजन सोहळा समितीने हाती घेतला. ज्यामध्ये डॉक्टर प्रवीणकुमार पानसरे , इंजि. विवेक पानसरे, प्रकाश पारखे सर, सामाजिक कार्यकर्ते हरिभाऊ ढमाले, रवी गिरी , राजू खरात, वैशाली राऊत, चंद्रकांत वाकचौरे ,किरण पानसरे, गणेश पानसरे व माजी जि. प. सदस्य सिताराम राऊत यांनी नियोजन केले.

# काकासाहेब तापकीर यांना मातृशोक

**कर्जत : (समर्थ गांवकरी)**

कर्जत तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती काकासाहेब लक्ष्मण तापकीर यांना मातृशोक झाला आहे. कर्जत तालुक्यातील खांडवी (वाकणवाडी) येथील रहिवासी आणि बाजार समितीचे सभापती काकासाहेब तापकीर यांच्या मातोश्री पार्वती लक्ष्मण तापकीर (वय - ९६) यांचे शुक्रवारी दि.१३ फेब्रुवारी रोजी दुपारी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा मोठा परिवार आहे. कै.पार्वती तापकीर ह्या खांडवी व परिसरात 'बाई' या नावाने सर्वांना सुपरिचित होत्या. त्या मनमिळावू स्वभावाच्या व धार्मिक, समाजकार्याची आवड असलेल्या जुन्या पिढीतील कणखर व्यक्तिमत्त्व म्हणून परिसरात ओळखले जात होत्या.

# विद्यार्थ्यांनी ध्येयवेडे होऊन परिक्षेला सामोरे जा : अविनाश पाटील गलांडे

## महालगाव येथील न्यू हायस्कूलमध्ये दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**वैजापुर : (समर्थ गांवकरी)**

सध्याच्या युगात स्पर्धा खुप वाढली आहे आणि यामध्ये जर टिकायचे असेल तर विद्यार्थ्यांनी ध्येयवेडे होऊन परिक्षेला सामोरे गेले पाहिजे तरच यश मिळेल असे मार्गदर्शन छत्रपती संभाजी नगर जिल्हा परिषदेचे माजी शिक्षण व आरोग्य सभापती अविनाश पाटील गलांडे यांनी विद्यार्थ्यांना केले.

.महालगाव (ता. वैजापुर) येथील न्यू हायस्कूलच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्याचा निरोप समारंभ कार्यक्रम संपन्न झाला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी शिक्षण व आरोग्य सभापती अविनाश पाटील गलांडे हे होते तर शालेय समितीचे सदस्य डॉ. प्रकाश शेळके, साईनाथ आहेर, दत्तात्रय नांगरे, नवनाथ गायकवाड, प्रकाश आल्हार, नुतन पंचायत समिती सदस्य राहुल आल्हाट, विशाल शेळके, कैलास बनकर परफेक्ट क्लासेसचे संचालक नानासाहेब चव्हाण, साळुंखे सर योगेश मोहिते, मुख्याध्यापक जे. बी. नारळे यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी प्रथम प्रशालेत



बांधण्यात आलेल्या सहकार महर्षी कै.विनायकराव पाटील सभागृहाचे उद्‌घाटन करण्यात आले.त्यानंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना मा. शिक्षण व आरोग्य सभापती अविनाश पाटील गलांडे म्हणाले की, आपल्या प्रशालेची उज्वल यशाची परंपरा नेहमी चांगलीच आहे. परंतू विद्यार्थ्यांनी नव्या संधी शोधल्या पाहिजेत उज्वल भविस्य घडवायचे असेल तर आपले कर्तृत्व सिद्ध करावे लागेल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी एमपीएसी व युपीएसी कडे वळले पाहिजे स्पर्धा परिक्षेचा महाराष्ट्राचा टक्का खुप कमी आहे. हा टक्का भविष्यात आपण वाढविला पाहिजे.

आपल ध्येय खुप मोठे असले पाहिजे आणि त्यापर्यंत पोहचण्यासाठी जिद्द आणि कष्टाची तयारी असली पाहिजे. कोणावरही अवलंबून न राहता स्वत:च कर्तृत्व सिद्ध करा आणि कॉफी मुक्त परिक्षा द्या. परिक्षेच्यावेळी मनावर कोणतेही दडपन ठेऊ नका असे ते म्हणाले यावेळी शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी यांची उपास्थती होती.

# सीईओ आनंद भंडारी यांनी घेतला चौथीचा क्लास

## कोळगाव जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांशी साधला संवाद

**श्रीगोंदा तालुका : (समर्थ गांवकरी)**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी कोळगाव येथे विविध विकासकामांची पाहणी केली. या भेटीदरम्यान त्यांनी कोळगाव येथील जिल्हा परिषद शाळेला अचानक भेट देत इयत्ता चौथीच्या वर्गात जाऊन विद्यार्थ्यांचा थेट क्लास घेतला.

भंडारी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मराठी, गणित, इंग्रजी, विविध शब्दांचे स्पेलिंग, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द, नकाशा वाचन तसेच छत्रपती शिवाजी महाराज आणि इतिहास विषयक प्रश्न विचारले. विद्यार्थ्यांनी उत्साहाने आणि समाधानकारक उत्तरे देत आपली तयारी दाखवून दिली. त्यांच्या प्रश्नोत्तरांमुळे वर्गात उत्साही वातावरण निर्माण झाले होते.




यावेळी त्यांनी शाळेतील सायन्स पार्कचीही पाहणी केली. सायन्स पार्कसाठी आवश्यक असलेले उर्वरित साहित्य लवकरात लवकर उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी संबंधितांना दिल्या. तसेच शाळेच्या रंगकामाबाबतही निर्देश देण्यात आले, जेणेकरून विद्यार्थ्यांना अधिक आकर्षक आणि प्रेरणादायी वातावरण मिळेल.

"मी स्वतः मराठी शाळेचा विद्यार्थी आहे," असे सांगत भंडारी यांनी मराठी भाषेप्रती असलेले प्रेम व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी केवळ गुणांपुरते शिक्षण न घेता कृतीयुक्त आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणावर भर द्यावा, असा सल्लाही त्यांनी दिला.

या प्रसंगी सरपंच पुरुषोत्तम लगड, उपसरपंच विलास शितोळे, ग्रामपंचायत सदस्य, वर्गशिक्षिका उज्वला भंडारे, मुख्याध्यापक रावसाहेब तांबे, अभिजीत दळवी, प्रवीण कवडे, शेलार, लोटके मॅडम आदी शिक्षक उपस्थित होते.

यानंतर त्यांनी अंगणवाडीतील लहान मुलांशीही संवाद साधला. सीईओ आनंद भंडारी यांच्या या अनौपचारिक व प्रेरणादायी भेटीमुळे विद्यार्थी, शिक्षक आणि ग्रामस्थांमध्ये समाधान व आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

# रविंद्र पानमंद यांच्या शेतात AI तंत्रज्ञानाचा वापर

**सांगवडे : (समर्थ गांवकरी)**

(सांगवडे,ता.मावळ) रविंद्र पानमंद यांच्या शेतामध्ये अलीकडे कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा यशस्वीपणे वापर करण्यात आला. या आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून जमिनीतील आर्द्रता, हवामान स्थिती आणि पाणी व्यवस्थापन यांचे अचूक निरीक्षण केले जात आहे. AI तंत्रज्ञानाच्या मदतीने जमिनीतील ओलावा (Moisture) तपासून पिकांना आवश्यकतेनुसार पाणी देण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. तसेच हवामानातील बदलांचा अंदाज घेऊन पाणी देण्याचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येत आहे. यामुळे पाण्याची बचत होऊन पिकांची वाढ सुधारण्यास मदत होत आहे. या तंत्रज्ञानाच्या वापरामुळे शेती अधिक आधुनिक, अचूक आणि शाश्वत बनण्यास मदत होत असून परिसरातील शेतकऱ्यांसाठी हे एक प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

# मेट्रो रेल्वेचा सॅल्प कोसळून १ ठार तर ३ जखमी

**मुंबई : (समर्थ गांवकरी)**

मुंबईतील मुलुंड परिसरात सुरू असलेल्या मेट्रो प्रकल्पाच्या कामादरम्यान शनिवारी दुपारी गंभीर अपघात घडला. एलबीएस मार्गावरील उभारणीच्या कामात असलेला काँक्रीट स्लॅब अचानक कोसळल्याने काही नागरिक ढिगाऱ्याखाली अडकल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. जॉन्सन अँड जॉन्सन कंपनीजवळ उभारण्यात येत असलेल्या मेट्रो पिलरचा होता. हा काँक्रीटचा तुकडा थेट रस्त्यावरून जात असलेल्या गाड्यांवर कोसळल्याची माहिती समोर आली आहे. हा या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. मिळालेल्या प्राथमिक माहितीनुसार, दुपारी सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास हा घटना घडली. जॉन्सन गार्डनजवळील बसथांब्याजवळ हा अपघात झाला. स्लॅब कोसळताना खाली उभ्या असलेल्या दोन ते चार वाहनांना



मोठा फटका बसल्याची माहिती आणि व्हिडीओ समोर येत आहे. काही जण जखमी झाल्याची शक्यता असून बचावकार्य वेगाने सुरू आहे. अपघातानंतर तात्काळ मुंबई अग्निशमन दल, पोलीस, मेट्रो प्रशासनाचे कर्मचारी, स्थानिक वॉर्ड कर्मचारी तसेच १०८ रुग्णवाहिका सेवा घटनास्थळी दाखल झाली. जखमींना बाहेर काढून उपचारासाठी रुग्णालयात हलवण्याचे काम तातडीने सुरू करण्यात आले. ढिगारा हटवून अडकलेल्या व्यक्तींना बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू असून जखमींना जवळील खासगी रुग्णालयात हलवण्यात येत आहे.

या दुर्घटनेत तीन ते चार प्रवासी जखमी झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. तर एकाच जागीच मृत्यू झाला आहे. दरम्यान, पोलिसांनी परिसर ताब्यात घेत वाहतूक वळवली असून पिलरचा ढिगारा हटवण्याचे कामही युद्धपातळीवर सुरू आहे. पुढील तपास सुरु आहे

# अध्यक्षपदी भास्कर हाबंर्डे तर स्वागताध्यक्षपदी अनिल पाटील

**नांदेड : (समर्थ गांवकरी)**

दरवर्षीप्रमाणे यावर्षीही छावा श्रमिक संघटना व, जिजाऊ प्रतिष्ठान, नांदेड, बजरंग सेना, NTSA , यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित. नांदेड शहरातील वजीराबाद येथे सार्वजनिक शिव जन्मोत्सव दि १९ फेब्रुवारी २०२७ च्या उप समितीचे अध्यक्ष म्हणून भास्करराव हंबर्डे यांची निवड करण्यात आली. तर कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष म्हणून शिवसेना ओबीसी जिल्हाप्रमुख तथा व्हॉईस ऑफ मिडीया पत्रकार संघाचे जिल्हा मुख्य सचिव अनिल पाटील धमणे डॉ. हंसराज वैद्य, सह स्वागत अध्यक्ष पदी अवतार सिंघ सोडी, अॅड चंद्रप्रकाश सांगवीकर यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी खालील कार्यक्रम होणार आहेत शिव प्रतिमेचे



पूजन, शिव रत्न पुरस्कारांचे वितरण भव्य अन्नदानाचे वाटप करण्यात येणार आहे या कार्यक्रमास सर्व जिजाऊ. शिव शंभु प्रेमीनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन भास्कर हंबर्डे. अनिल पाटील धमणे . डॉ हंसराज वैद्य. अवतारसिंघ सोडी . आदींनी केले आहे या कार्यक्रमा प्रसंगी निवड झालेल्या निवड समितीतील सर्व पदअधिकारी यांच्या वर अभिनंदनाचा वर्षाव केला जात आहे.

# २५ वर्षांच्या सामाजिक कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल!

# निलेश सोमानी यांना 'जागतिक नेतृत्व' सन्मान!

**वाशीम : (समर्थ गांवकरी)**

सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार निलेश स्नेहलता पुनमचंद सोमानी यांच्या गेल्या २५ वर्षांपासून सुरू असलेल्या अविरत सामाजिक कार्याची आंतरराष्ट्रीय स्तरावर दखल घेण्यात आली असून त्यांना 'जागतिक नेतृत्व' या प्रतिष्ठित सन्मानाने गौरविण्यात आले आहे. Theophany International University व Leaders Autonomy International यांच्या संयुक्त विद्यमाने हा सन्मान प्रदान करण्यात आला.

१२ फेब्रुवारी २०२६ रोजी कारंजा येथील कृषी उत्पन्न बाजार समिती प्रांगणात आयोजित



विशेष कार्यक्रमात हा गौरव सोहळा पार पडला. या वेळी श्री महाकाली संस्थान कासोळा देव येथील परमपूज्य गजानंद माऊली, कारंजा-मानोरा विधानसभा मतदारसंघाच्या आमदार Saitai Dahake तसेच आयोजक सामाजिक कार्यकर्ते प्रा. डॉ. अब्दुल अकील यांच्या हस्ते सन्मानपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन सोमानी यांचा गौरव करण्यात आला. विद्यापीठाचे अध्यक्ष प्रा. लेविझॉन लुंडी व जनसंपर्क अधिकारी डॉ. झाल्डी देलेंजर यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र त्यांना प्रदान करण्यात आले.

मानवतेचा प्रचार, शांती व सर्वधर्मसमभावाची जोपासना, जीवदया, 'जलतारा' अभियान, Paani Foundationच्या उपक्रमांत सक्रिय सहभाग, तलाव पुनर्जीवन कार्य, आरोग्य व रक्तदान शिबिरे, स्वच्छता व महिला सशक्तीकरण अभियान, शेतकरी आत्महत्यांवर प्रबोधन अशा अनेक उपक्रमांत सोमानी यांनी पुढाकार घेतला आहे.

कोरोना काळात गरजूंना किराणा किटचे वितरण, रुग्णालयांना ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर व व्हेंटिलेटर उपलब्ध करून देण्यासाठी केंद्रीय मंत्री Nitin Gadkari यांच्या माध्यमातून सहकार्य, तसेच सातत्याने ऑक्सिजन बँक चालवून निशुल्क सेवा देणे, रुग्णवाहिकेद्वारे मदत आदी कार्य उल्लेखनीय ठरले आहे.

शाळा-महाविद्यालयांत २००० हून अधिक व्याख्यानांद्वारे देशभक्ती व राष्ट्रभक्तीचे प्रबोधन, व्यसनमुक्ती उपक्रम, आदिवासी भागातील सेवा, नोंदणी विवाह मार्गदर्शन, सामूहिक विवाह सोहळ्यांचे आयोजन या माध्यमातूनही त्यांनी समाजकार्याला चालना दिली आहे. वाशीम येथे ऐतिहासिक ५०१ सामूहिक विवाह सोहळ्यात सचिव म्हणून जबाबदारी पार पाडत उपक्रम यशस्वी करण्यासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

राष्ट्रसंत Tukdoji Maharaj व कर्मयोगी Gadge Maharaj यांच्या विचारांचे प्रसार-प्रचार, 'ग्रामगीता' चे बीजारोपण, अध्यात्मिक कार्य व विविध सामाजिक उपक्रमांच्या आयोजनातून सौहार्द वृद्धिंगत करण्याचे कार्य त्यांनी सातत्याने केले आहे.

सोमानी यांना यापूर्वीही आंतरराष्ट्रीय स्तरावर 'आचार्य' पदवी प्राप्त झाली असून केंद्र व राज्य शासनासह विविध सामाजिक संस्थांकडून त्यांचा गौरव करण्यात आला आहे. त्यांच्या या यशामुळे वाशीम जिल्ह्याचे नाव जागतिक पातळीवर झळकले असून सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

# वर्तमानपत्र चालवणे संपादकांसाठी खडतर - डॉ. विश्वासराव आरोटे

## समाजहिताचे उपक्रम राबवणाऱ्या पत्रकारांना एन के टी ग्रुपचा सदैव पाठिंबा - नानजीभाई ठक्कर








### मुरबाडमध्ये 'जनतेचा जनदूत'चा ७ वा वर्धापन दिन दिमाखात साजरा; पत्रकारितेच्या सामाजिक जबाबदारीचा पुनरुच्चार!

**ठाणे | मुरबाड : (समर्थ गांवकरी)**

मुरबाड येथील कुणबी भवनमध्ये महाराष्ट्राचा बुलंद आवाज म्हणून ओळख असलेल्या दैनिक जनतेचा जनदूतचा ७ वा वर्धापन दिन सोहळा भव्य आणि दिमाखदार वातावरणात पार पडला. या निमित्ताने "जनतेचा जनदूत पुरस्कार २०२६" देऊन विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा सन्मान करण्यात आला.

या सोहळ्यात प्रमुख वक्ते म्हणून महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी पत्रकारितेच्या बदलत्या परिस्थितीवर भाष्य केले. "वर्तमानपत्र चालवणे ही सध्याच्या संपादक मंडळासाठी अत्यंत खडतर आणि तारेवरची कसरत आहे. ब्रिटिश काळात कारखान्यातील पगार दीड आणा आणि वर्तमानपत्राची किंमतही दीड आणा होती. आज सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार लाखोंमध्ये गेले, मात्र दैनिकाची किंमत चार ते पाच रुपयांतच आहे. तरीही सत्य मांडणाऱ्या वर्तमानपत्रांवर वाचकांचा विश्वास कायम आहे," असे त्यांनी सांगितले.

ग्रामीण व शहरी भागातील पत्रकारांनी नेहमीच जनतेच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवल्या आणि त्यासाठी पाठपुरावा केला, यामुळेच पत्रकारितेची विश्वासार्हता अबाधित राहिली असल्याचे त्यांनी नमूद केले. "जोपर्यंत चंद्र-सूर्य आहेत, तोपर्यंत वाचक वर्ग दैनिकाला विसरणार नाही," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान स्वामी शिव रुपानंद महाराज (अध्यक्ष, भारतीय संत समिती सहमंत्री कोकण प्रांत) यांनी भूषविले. प्रमुख उपस्थितीत थोर समाजसेवक नानजीभाई ठक्कर, ह.भ.प. आनंद महाराज जोशी (अखिल वारकरी सेवा प्रतिष्ठान), संपादिका मंजुळाताई निचिते, सुदाम पाटील (सल्लागार, दै. जनतेचा जनदूत), श्यामसुंदर केंद्रे महाराज (वारकरी संस्था, देवाची आळंदी), किरण निचिते (संस्थापक संपादक, दै. जनतेचा जनमत), सुभाष घरत (माजी जि.प. सदस्य), उल्हास बांगर, सुरेश बांगर (बाजार समिती संचालक), दिपक पवार (भाजप अध्यक्ष), जुगल जाखोटीया, जयवंत कराळे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पत्रकारिता क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल ज्येष्ठ पत्रकार संजय बोरगे यांना मानपत्र, स्मृतिचिन्ह व फेटा बांधून सन्मानित करण्यात आले. तसेच ठाणे व रायगड जिल्ह्यातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन व संतवाणीने झाली. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून पत्रकारितेची सामाजिक जबाबदारी अधोरेखित करत जनतेचा जनदूतच्या सात वर्षांच्या यशस्वी प्रवासाचे कौतुक केले.

निर्भीड, तटस्थ आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारी लेखणी हेच या दैनिकाचे वैशिष्ट्य असल्याचे गौरवोद्गार काढण्यात आले.

सोहळ्यात महिलांची लक्षणीय उपस्थिती होती. महिलांसाठी विशेष हळदी-कुंकू समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. सांस्कृतिक कार्यक्रम व भक्तीगीतांनी वातावरण अधिक उत्साही झाले.

सल्लागार सुदाम पाटील यांनी आपल्या भाषणात सांगितले, "जनतेचा आवाज बुलंद करण्यासाठी आणि समाजातील सकारात्मक कार्याचा सन्मान करण्यासाठी हे व्यासपीठ कायम कार्यरत राहील." पुढील काळात अधिक सामाजिक उपक्रम राबवण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला.



समाजातील विविध क्षेत्रांना एकत्र आणत सामाजिक एकोपा व कृतज्ञतेची भावना वृद्धिंगत करणारा हा सोहळा मुरबाडमध्ये विशेष चर्चेचा विषय ठरला. कार्यक्रमाला पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती लाभली.

## ग्रामपंचायत कार्यालय सितेवाडी, ता.जुन्नर, जि. पुणे

### जाहीर निविदा सुचना क्र. सन २०२५-२६

ग्रामपंचायत सितेवाडी, ता.जुन्नर, जि. पुणे यांचे तर्फे ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन / जिल्हा परिषद यांचेकडील पंजीकरण / नोंदणीकृत केलेल्या योग्य त्या वर्गातील पात्र नोंदणीकृत कंत्राटदार यांजकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामाच्या निविदा मागविण्यात येत आहेत. ग्रामपंचायत सितेवाडी, ता.जुन्नर, जि. पुणे यांचे वतीने खालील कामांच्या बी-१ निविदा दोन लिफाफा पद्धतीने योग्य त्या नोंदणीकृत मक्तेदारांकडून मागविणेत येत आहे. कामांबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केला असून कोरा निविदा संच दि.१२/०१/२०२६ ते १९/०१/२०२६ पर्यंत सकाळी १० ते ५ या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात रोखीने अथवा धनाकर्ष भरणा करून उपलब्ध आहे. परीपूर्ण भरलेल्या निविदा वरील कालावधीतच सादर करणे बंधनकारक आहे. निविदा शक्य झाल्यास २१/१/२०२६ च्या मासिक सभेत उघडण्यात येतील. निविदा अटी व शर्तीमध्ये बदल करणे अथवा प्राप्त निविदांपैकी कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार ग्रामपंचायतने राखून ठेवला आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | अंदाजीत रक्कम | निविदा फी | इसारा रक्कम | काम पुर्णचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | घनकचरा सांडपाणी व्यवस्थापन | ५४१२७४/- | ५००/- | ५००/- | ६ महिने | खुला |

टिप - वरील कामाबाबत नियम, शर्ती, अटी व इतर सर्व सविस्तर माहिती ग्रामपंचायत कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर पहावयास मिळेल.

ग्रामपंचायत अधिकारी सरपंच
ग्रामपंचायत सितेवाडी, ता.जुन्नर, जि.पुणे

## १६ स्काऊट पुरस्काराचे मानकरी

**श्रीगोंदा तालुका: (समर्थ गांवकरी)**

श्रीगोंदा तालुक्यासाठी अभिमानाची बातमी समोर आली असून, महादजी शिंदे विद्यालय, श्रीगोंदा येथील तब्बल १६ स्काऊट विद्यार्थ्यांनी राज्यपाल पुरस्कार प्राप्त करून विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. महाराष्ट्र राज्य भारत स्काऊट गाईड यांच्या वतीने दिनांक २७ ते ३० जानेवारी २०२६ दरम्यान राज्य प्रशिक्षण केंद्र, रामबाग - भोर येथे आयोजित राज्य पुरस्कार चाचणी शिबिरात या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. चार दिवस चाललेल्या या शिबिरात लेखी, तोंडी आणि प्रात्यक्षिक अशा विविध परीक्षांद्वारे विद्यार्थ्यांची कसोटी घेण्यात आली. कठोर परिश्रम, शिस्तबद्ध तयारी आणि आत्मविश्वासाच्या बळावर सर्व १६ स्काऊट विद्यार्थ्यांनी या चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण करून राज्यपाल पुरस्कार पटकावला.

## अकोले तालुका पंचायत समितीच्या पुरुषांची नेत्रदीपक कामगिरी




**अकोले : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद अहिल्यानगर अधिकारी व कर्मचारी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धा २०२६ मध्ये पंचायत समिती अकोलेच्या पुरुषांनी नेत्रदीपक कामगिरी करत विविध क्रीडा प्रकारात उत्तुंग यश मिळविले.

अहिल्यानगर येथे माऊली सांस्कृतिक भवन मध्ये आयोजित कार्यक्रमात जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी दादाभाऊ गुंजाळ व उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहुल शेळके यांच्या प्रमुख उपस्थित व मार्गदर्शनाखाली या स्पर्धा संपन्न झाल्या. पंचायत समिती अकोलेच्या विविध विभागातील कर्मचाऱ्यांच्या समन्वयातून विविध क्रीडा प्रकारांत पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग घेत उत्कृष्ट कामगिरी केली. जिल्हास्तरीय स्पर्धेतील हॉलीबॉल, बास्केट बॉल, टेबल टेनिस, कॅरम एकेरी, कॅरम दुहेरी, बॅडमिंटन, थाळीफेक, 400 मीटर धावणे, भालाफेक अशा विविध क्रीडा प्रकारात अकोले च्या स्पर्धकांनी यश संपादन केले.

तसेच जिल्हास्तरीय स्पर्धेतील विजेते हॉलीबॉल संघात रवींद्र सोनवणे (कॅप्टन), सुरज चव्हाण, शेलार सर, बांबळे भाऊसाहेब, लोहकरे भारत, संतोष देशमुख या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत जिल्ह्यात अंतिम विजेता संघ ठरला.

सर्व यशस्वी स्पर्धकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, अकोलेचे गटविकास अधिकारी अमर माने, कृ.वि.अधिकारी विकास चौरे आदींनी कौतुक केले.

## सांस्कृतिक महोत्सव संपन्न



**जुन्नर तालुका : (समर्थ गांवकरी)**

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चिल्हेवाडी येथे विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासा बरोबरच विद्यार्थ्यांमधील कला गुणांना व्यासपीठ मिळावं या हेतूने शाळेमध्ये सांस्कृतिक महोत्सव संपन्न करण्यात येत असतो.याही वर्षी सदर कार्यक्रम शनिवार दिनांक १४ फेब्रुवारी २०२६ रोजी संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच अनुसया भोईर , उपस्थित मान्यवर उपसरपंच नितीन भोईर,माजी सरपंच तथा सदस्य दामोदर बूळे,पेसा मोबिलायझर सुनीता भोईर, माजी सरपंच योगिता ठोंगीरे,अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती विनोद भोईर उपाध्यक्ष रावसाहेब भोईर,ह.भ. प. नामदेव महाराज वायळ,संजय ठोंगीरे,पालक, ग्रामस्थ बचत गट सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे आदिवासी संस्कृतीचा वसा आणि वारसा पुढील पिढीसाठी ही सदोदित राहावा यासाठी आदिवासी लोकनृत्य घेण्यात आली होती. चिऊताई माझ्या अंगणात ये पासून तर आनंद दायी स्वर्गात आकाशगंगा या गीतापर्यंतची एक से बढकर एक अशी २० गाणी घेण्यात आली.

## चिमुकल्यांकडून पुस्तकांचे वाचन करत कुसुमाग्रज वाचन अभियानाचा शुभारंभ

### जिल्हा परिषदेच्या मांडेवाडी शाळेत गटविकास अधिकारी अमर माने यांचेकडून कुसुमाग्रज वाचन अभियानाचा शुभारंभ

**अकोले : (समर्थ गांवकरी)**

अनेकदा विविध उपक्रम, प्रकल्पांचा शुभारंभ फीत कापून, नारळ फोडून होत असतो. अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या कुसुमाग्रज वाचन अभियानाचा शुभारंभ बालवाचनालयातील पुस्तकांचे विद्यार्थ्यांकडून वाचन करत अनोख्या पद्धतीने झाला.

तालुक्याच्या डोंगराळ व दुर्गम भागात वसलेल्या जिल्हा परिषदेच्या मांडेवाडी शाळेत आयोजित कार्यक्रमास गटविकास अधिकारी अमर माने, शिक्षण विस्तार अधिकारी संभाजी झावरे, केंद्रप्रमुख देवेंद्र आंबेटकर उपस्थित होते. यावेळी बोलताना अमर माने म्हणाले बालवयात मुलांना वाचनाची आवड लागली तर मुले अधिक समृद्ध होतील. अनेक मोठी व्यक्तिमत्व त्यांना पुस्तकात भेटतील. आयुष्यातील निश्चित ध्येय गाठण्यासाठी याचा चांगला उपयोग होईल, म्हणूनच कुसुमाग्रज वाचन अभियानाची प्रभावी अंमलबजावणी तालुक्यात करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.




विस्तार अधिकारी संभाजी झावरे बोलताना म्हणाले वाचनाने माणूस समृद्ध होतो मनोरंजन व ज्ञानही मिळते. वाचन ही आनंद देणारी गोष्ट आहे. मुलांनी आवडणारी पुस्तके अधिक वाचावी व वाचनाचा छंद जोपासावा असे आवाहन यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना केले. कुसुमाग्रज वाचन अभियानांतर्गत जिल्हा परिषदेच्या मांडेवाडी शाळेत छोटेखानी बाल वाचनालयाची निर्मिती केली आहे.




मांडेवाडी शाळेत सुरू असलेल्या विविधांगी उपक्रमांबरोबरच 'बाला' उपक्रमाचे गटविकास अधिकाऱ्यांनी कौतुक केले. दुर्गम भागातील शाळेत मुलांचे वाचन लेखन पाहून त्यांनी आनंद व्यक्त करत मुलांना शुभेच्छा दिल्या.

शिक्षक भाऊसाहेब कासार अक्षरभारती वाचनालयाच्या माध्यमातून वाचनाचा प्रचार आणि प्रसार ग्रामीण भागात करत आहे. त्यांच्या 'फिरते वाचनालय' या उपक्रमाचे कौतुक केले.

ज्या शाळांकडे वाचनालयाची पुस्तके कमी उपलब्ध असतील त्यांनी अशा फिरत्या वाचनालयातील पुस्तकांचा आधार घेत विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी प्रेरित करावे असे आवाहन यावेळी गटविकास अधिकारी यांनी केले. मांडेवाडी शाळेत झालेल्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक ज्ञानदेव फापाळे यांनी केले. अनुष्का रंधे हिने आभार मानले.

# जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत रेनवडी शाळेच्या विद्यार्थ्यांची गरुडझेप



**पारनेर : (समर्थ गांवकरी)**

अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या प्रतिष्ठेच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत, जिल्ह्यातील १४ तालुक्यांतील हजारो खेळाडूंना मागे टाकत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रेनवडी येथील विद्यार्थ्यांनी उत्तुंग यश संपादन केले आहे. शाळेतील दोन विद्यार्थ्यांनी उंच उडी क्रीडा प्रकारात उत्कृष्ट कामगिरी करत रेनवडी गावासह तालुक्याचे नाव जिल्हास्तरावर उंचावले आहे. कठोर परिश्रम आणि जिद्दीच्या जोरावर रेनवडी शाळेच्या खेळाडूंनी मैदानावर आपले वर्चस्व सिद्ध केले. संकेत आनंदा पवार याने लहान गटातील 'उंच उडी' प्रकारात चमकदार कामगिरी करत तृतीय क्रमांक पटकावला.करण शुक्रराज पवार मोठ्या गटातील 'उंच उडी' प्रकारात उत्कृष्ट उडी मारत द्वितीय क्रमांक मिळवला.

ग्रामीण भागात क्रीडा सुविधांची मर्यादित उपलब्धता असतानाही, या विद्यार्थ्यांनी न्यूनगंड बाळगला नाही. स्वतःची मेहनत, अफाट जिद्द आणि आत्मविश्वासाच्या जोरावर त्यांनी हे यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशाने हे सिद्ध केले आहे की, सुविधांपेक्षा इच्छाशक्ती महत्त्वाची असते.विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक कु. सचिन गांगड सर आणि निलेश कवडे सर यांचे अथक परिश्रम आहेत. त्यांनी घेतलेल्या विशेष सरावामुळेच विद्यार्थ्यांना हे यश शक्य झाले. तसेच, मुख्याध्यापक मच्छिंद्रनाथ पावडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील सर्व शिक्षक - गोकुळ व्यवहारे सर आणि सौ. शुभांगी सोनवणे यांनी विद्यार्थ्यांना मानसिक व शैक्षणिक पाठिंबा दिला.

या यशासाठी केंद्रप्रमुख नारायण बाचकर आणि विस्तार अधिकारी सौ. जयश्री व्होरा यांनी वेळोवेळी भेट देऊन खेळाडूंना प्रोत्साहन व मोलाचे मार्गदर्शन केले. रेनवडी शाळेच्या विद्यार्थ्यांच्या या जिल्हास्तरीय यशाबद्दल परिसरात आनंदाचे वातावरण आहे. शाळा व्यवस्थापन समिती, पालक वर्ग, ग्रामस्थ आणि लोकप्रतिनिधींनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले असून, त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.




ठाणे : पुलवामा हल्ल्यातील शहिदांना मानवंदना, 14 फेब्रुवारी 2019 रोजी पुलवामा येथे दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्यात 40 सीआरपीएफ जवान शहीद झाले होते. या जवानांना राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष मनोज प्रधान आणि नौपाडा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभय महाजन यांनी चंदनवाडी येथील शहीद उद्यानातील स्मारकात मानवंदना दिली. यावेळेस राष्ट्रवादी काँग्रेस-शरदचंद्र पवार पक्षाचे कार्यकर्ते उपस्थित होते. (फोटो - संतोष पडवळ)

## थोडक्यात बातम्या...



### ठाण्यात 'हिंद-दी-चादर' उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

ठाणे (स. गांवकरी) : 'हिंद-दी-चादर' म्हणून ओळखले जाणारे श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त ठाणे महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यांच्या त्याग, बलिदान आणि धर्मनिष्ठेचा संदेश विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमांना विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे. विद्यार्थ्यांना गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनकार्याची सविस्तर माहिती देण्यात येत आहे. नौपाडा येथील सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेच्या विद्यार्थ्यांना प्रभात फेरी काढून गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या कार्याचा जागर केला. ठाणे महानगरपालिका शाळा क्र. 130 मधील विद्यार्थ्यांनी येथे प्रभात फेरी काढून घोषणांच्या माध्यमातून जनजागृती करण्यात आली. यावेळी त्यांच्या जीवनातील प्रेरणादायी प्रसंग विद्यार्थ्यांना सांगण्यात आले. शाळांमध्ये विद्यार्थ्यांना गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या जीवनावर आधारित लघुपट दाखविण्यात आले. या उपक्रमांचा मुख्य उद्देश तरुण पिढीने गुरु तेग बहादूर साहिबजी यांचा त्याग, बलिदान आणि मानवतेच्या रक्षणासाठी दिलेले योगदान स्मरणात ठेवावे, तसेच राष्ट्रीय एकात्मता व सामाजिक मूल्यांची जपणूक करावी, हा आहे.

### भांडगाव जि. प. शाळेत 'कुसुमाग्रज वाचन अभियानाचा' उत्स्फूर्त प्रारंभ

पारनेर (स. गांवकरी) : मराठी भाषेचे भूषण आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी वि. वा. शिरवाडकर अर्थात कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस (२७ फेब्रुवारी) हा 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. याचेच औचित्य साधून अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांच्या संकल्पनेतून शनिवार, दि. १४ फेब्रुवारीपासून संपूर्ण जिल्ह्यात 'कुसुमाग्रज वाचन अभियान' या नावीन्यपूर्ण उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत भांडगाव येथील जिल्हा परिषद शाळेतही वाचन चळवळ अधिक दृढ करण्यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाची सुरुवात शाळेत आयोजित करण्यात आलेल्या विशेष बालसभेने झाली. याप्रसंगी बोलताना शाळेतील शिक्षक बाळासाहेब सालके यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व विषद केले. "वाचाल तर वाचाल" या उक्तीचा अर्थ सांगताना त्यांनी महापुरुषांच्या जीवनातील उदाहरणे देऊन पुस्तके माणसाची कशी सोबती असतात, हे पटवून दिले. वाचन संस्कृती रुजवण्यासाठी आणि शाळेतील वाचनालय समृद्ध करण्यासाठी मुख्याध्यापक अप्पासाहेब नरवडे यांनी एक स्तुत्य आवाहन केले. त्यांनी गावातील दातृत्ववान व्यक्तींना वाढदिवस, सत्कार समारंभ यांसारख्या कार्यक्रमांवर होणारा अवाजवी खर्च टाळून, त्याऐवजी शालेय विद्यार्थ्यांना पुस्तके भेट देण्याचे आवाहन केले. या आवाहनाला उपस्थित ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या पुस्तकांचे वाचन केले, ज्यामुळे शाळेत आनंदी आणि शैक्षणिक वातावरण निर्माण झाले.



### बेलोटे कुटुंबाने जपला सामाजिक उपक्रम

पारनेर (स. गांवकरी) : जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील शिक्षक दिलीप ज्ञानेश्वर बेलोटे यांचे एक वर्षापूर्वी निधन झाले त्यांची स्मृती जतन करण्यासाठी त्यांच्या बेलोटे कुटुंबाने पुण्यस्मरण दिनानिमित्त निघोज आणी देवीभोयरे जिल्हा परिषद शाळेतील चारशे पेक्षा जास्त विद्यार्थ्यांना जेवण दिले तसेच देवीभोयरे जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील वाचनालयासाठी कपाट तसेच पुस्तके भेट दिली तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले अशाप्रकारे कै. बेलोटे सर यांच्या पत्नी शिक्षीका आशाताई बेलोटे, सिद्धी बेलोटे,संज्योत बेलोटे तसेच लाळगे व बेलोटे परिवार नातेवाईक आप्तेष्ट यांनी हा सामाजिक उपक्रम राबवून अभिनव काम केले असून बेलोटे कुटुंबाचे सर्वत्र कौतुक होत आहे. यावेळी जिल्हा परिषदेच्या माजी सदस्या पुष्पाताई वराळ पाटील, सरपंच अशोकराव मुळे, शिक्षक नेते रा या औटी, शिक्षक सहकारी बँकेचे संचालक कारभारी बाबर, रावसाहेब रोहकले, केंद्र प्रमुख बाचकर सर, प्रविण ठुबे, निघोज जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक गणपतराव देठे, गौतम साळवे, देवीभोयरे शाळेचे मुख्याध्यापक वाळुंज सर, पाराजीशेठ गावडे, रविंद्र शिंदे, भिमाशेठ घुले, सेवानिवृत्त प्राचार्य रामचंद्र महाराज सुपेकर, सुहास लाळगे, अनिकेत लाळगे, स्वरांजली केक्स गृहउद्योग समूहाच्या अध्यक्षा सरला रोहन उनवणे, संतोष साबळे, बाळासाहेब थोपटे, गौतम साळवे,रवी रोकडे, बाळासाहेब दिघे, बाजीराव भाईक, रंगनाथ गोसावी, रामचंद्र वरखडे, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष निलेश झावरे आदी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# गुणदर्शन व स्नेहसंमेलन सोहळा दिमाखात संपन्न!

**अकोले : (समर्थ गांवकरी)**



जि.प.प्रा.शाळा अकोले व भास्करराव कदम गुरुजी प्रि-प्रायमरी स्कूल अकोले यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विविध गुणदर्शन कार्यक्रम व वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडले.

विद्यार्थ्यांनी नृत्य, गीत, नाटिका, देशभक्तीपर सादरीकरणे आणि विविध सांस्कृतिक कार्यक्रमांद्वारे उपस्थितांची मने जिंकली. चिमुकल्यांच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून आमदार डॉ. किरण लहामटे यांची उपस्थिती लाभली. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विधीतज्ञ वसंतराव मनकर होते. तसेच नगराध्यक्ष बाळासाहेब वडजे, सोनाली नाईकवाडी, अक्षय अभाळे, रविराज भांगरे, वैष्णवी ताई धुमाळ, शितल वैद्य, सागर चौधरी, गटशिक्षणाधिकारी अरविंद कुमावत, केंद्रप्रमुख भांगरे साहेब, विनय सावंत, प्रकाश टाकळकर, पोलीस उपनिरीक्षक हजारे साहेब व पत्रकार अमोलजी वैद्य आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान शैक्षणिक, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. आमदार लहामटे यांनी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करत शाळेच्या प्रगतीसाठी सातत्याने सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी त्यांनी शाळेसाठी सुमारे ६० लाख रुपयांची सुसज्ज अभ्यासिका उभारून देण्याची घोषणा केली. या घोषणेने पालक व ग्रामस्थांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष प्रकाश साळवे, कैलास वैद्य व सर्व सदस्य, मुख्याध्यापिका अनिता डावरे मॅडम, तसेच सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी व पालकांनी विशेष परिश्रम घेतले. उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्याने शाळेच्या शैक्षणिक व सांस्कृतिक वाटचालीत आणखी एक मानाचा तुरा रोवला.

# नाशिक ते जगन्नाथ पुरी ओडीशा पर्यंत निघाली राष्ट्रीय गौरव यात्रा

**नाशिक : (समर्थ गांवकरी)**

■ १९ फेब्रुवारी रोजी जगन्नाथ पुरी येथे होणार भव्यदिव्य शिवजन्मोत्सव सोहळा पडणार पार

छावा भारत क्रांती मिशनच्या वतीने या वर्षी १९ फेब्रुवारी २०२६ रोजी श्रीक्षेत्र जगन्नाथ पुरी, ओडिशा येथे राष्ट्रीय शिवजन्मोत्सव साजरा करण्यात येणार आहे. नाशिक ते जगन्नाथ पुरी राष्ट्रीय गौरव यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. १४ ते २१ फेब्रुवारी पर्यंत ही रथ यात्रा असणार आहे.

या सोहळ्याच्या निमित्ताने नाशिक जिल्ह्यातून विशेष प्रारंभ करण्यात येणार आला . शनिवारी दि. १४ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी नाशिक जिल्ह्याचे ग्रामदैवत कालिकामाता मंदिर येथून छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा असलेला रथ ढोल-ताशांच्या गजरात, नारळ फोडून, महापौर हिमगौरी आडके, आमदार प्रा देवयानी फरांदे यांनी रथयात्रेचे स्वागत करत श्री फळ वाढवत रथयात्रा मार्गस्थ झाली. यावेळी डॉ विलासभाऊ पांगारकर राष्ट्रीय अध्यक्ष, करण गायकर, ओम शांती परिवाराच्या पूनम दीदी, बाळासाहेब सोनवणे सर, देवानंद बिरारी, छबुराव थोरात, अमोल सोनवणे विष्णू पांगरकर अतुल पांगरकरआदि संह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. ठिकठिकाणी राष्ट्रीय गौरवरात्र यात्रेचे स्वागत करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराज राष्ट्रीय गौरव यात्रा अश्वारूढ रथ सह सिन्नर, वावी पांगरी, शिर्डी समृद्धी हायवे, छत्रपती संभाजी नगर, शिंदखेड राजा , नागपूर छत्तीसगडची राजधानी रायपुर व ओडिशा राज्यातील संभलपुर, कटक, भुवनेश्वर मार्ग ही रथ यात्रा पुरी धाम येथे पोहोचेल.

# ठाण्यातील मालवणी महोत्सवात साहित्य संमेलनाची सांगता




**ठाणे : (समर्थ गांवकरी)**

कोकण ग्राम विकास मंडळ यांच्या वतीने आणि भाजप नगरसेवक सीताराम राणे यांच्या पुढाकारातून ठाण्यात सुरू असलेल्या भव्य मालवणी महोत्सवात कवीवर्य मंगेश पाडगावकर यांच्या नावाने उभारलेल्या कलादालनात दुसऱ्या दिवशी साहित्य संमेलनाची सांगता काव्य वाचनाने झाली. या कवी संमेलनात तब्बल ३८ स्पर्धक कवींनी सहभाग घेत काव्यवाचनाची देखणी जुगलबंदी सादर केली. ठाण्याच्या शिवाईनगर, उन्नती गार्डन मैदानातील स्व. अजितदादा पवार महोत्सव नगरीत सुरू असलेल्या मालवणी महोत्सवाचे यंदा २७ वे वर्ष आहे. महोत्सवात कवीवर्य मंगेश पाडगावकर कलादालनात सायंकाळी काव्यधारा बरसल्या. महाविद्यालयीन विद्यार्थिनी संज्योत ढवळे हिने स्वरचित कवितेद्वारे मराठी राजभाषा दिनाच्या निमित्ताने मराठीतील दिग्गज कवीवर्यांचा उल्लेख असलेल्या कवितेतुन अनोखी कवितांजली वाहिली.

'सखे गं बाई' या कवितेतून एकनाथ शेडगे यांनी स्वतः अनुभवलेल्या प्रेमभावना व्यक्त केल्या. जयेश मोरे यांनी 'नको मोगरा किंवा चाफा' सादर केली, तर वयोवृद्ध नवोदित कवी मनमोहन रोगे यांनी 'शुभ-अशुभ' ह्या काव्यातुन अंधश्रद्धेवर प्रहार केले. रूपाली महाजन हिने नव्या जमान्यातील कविता सादर करत उपस्थितांची दाद मिळवली. साहित्यिका प्रज्ञा पंडित यांनी कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन केले.

# पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचे प्रदर्शन व मेळावा उद्घाटन कार्यक्रम संपन्न

**पुणे : (समर्थ गांवकरी)**



दि.१३/०२/२०२६ ते १५/०२/२०२६ या तीन दिवसाचे पंतप्रधान कौशल्य सन्मान योजनेतील पात्र विश्वकर्मांचे राज्यस्तरीय प्रदर्शन व विक्री व प्रोत्साहन कार्यक्रमाचे उद्घाटन मा. श्री. रवींद्र साठे अध्यक्ष ,(राज्य मंत्री दर्जा )महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ ,मुंबई यांचे शुभहस्ते सोनल हॉल प्रदर्शन सेंटर ,कर्वे रोड ,येथे संपन्न झाले.

सदर उपक्रम भारत सरकारचे सुक्ष्म लघु व मध्यम मंत्रालय विकास व सुविधा कार्यालय मुंबई व महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ,पुणे यांच्या संयुक्त माध्यमातून आयोजित करण्यात आले. यामध्ये विश्वकर्मा योजनेतील विश्वकर्मा कारागिरांचे सक्षमिकरण करण्याचे उदिष्ठानुसार त्यांना बाजारपेठ मिळवून देण्यासाठी सुतारकाम (५ )लोहार (२)सुवर्णकार(१०),माळाकार(२) कुंभार(५)शिल्पकार(१) शिवणकाम(गारमेन्ट),(२०),चर्मकार (५),बुटिककाम (2),कोरीव दगड काम ,खेळणी स्टॉल (२) ,एकूण स्टॉल 67 विश्वकर्मानी या प्रदर्शनात सहभाग घेऊन ,कोल्हापुरी चप्पल ,पर्स ,दर्जेदार बुटिक साड्या ,गारमेन्ट वस्तु व महिलांसाठी सुवर्णकारांनी केलेले दागिने लक्ष वेधून घेत आहेत. या कार्यक्रमाचे उद्घाटन झाल्यानंतर मान्यवरांचे हस्ते महात्मा गांधी यांचे प्रतिमेस सुतिहार अर्पण करून दिपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरवात झाली. या प्रसंगी व्यासपीठावर प्रमुख अतिथि मा श्री. रवींद्र साठे (सभापती ) महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळ यांचे स्वागत एम .एस. एम. इ ,डि .एफ .ओ मुंबई, संचालक श्री. मिलिंद बारापत्रे यांनी केले तसेच व्यापीठावर श्री. सुहास इंगळे उपाध्यक्ष इंडो जर्मन टूल रूम व श्रीकांत सारडा, मॅनेजिंग डायरेक्टर, एक्सेलन्सी यांचा ही सत्कार श्री. बारापत्रे यांनी केला तसेच जिल्हा सुकाणू समितीचे सदस्य श्री विकास जगताप व श्री.धर्मेंद्र खांडरे यांचे स्वागत मंडळाचे सभापती श्री. रवींद्र साठे यांनी केले. तसेच जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक् श्रीमती .कोठारी मॅडम यांचे व एम एस एम ई चे सहसंचालक श्री. अभय दफ्तरदार यांनी जिल्हा ग्रामोद्योग अधिकारी श्री. रमेश सुरुंग यांचे स्वागत केले. तसेच मंडळाचे सभापती श्री .रवींद्र साठे यांनी श्री.अभय दफ्तरदार यांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. अभय रावेतकर राज्य समन्वयक पी. एम. विश्वकर्मा योजना यांनी केले. या कार्यक्रमामध्ये प्रस्ताविक श्री.अभय दफ्तरदार, सहसंचालक, डि एफ ओ मुंबई यांनी करून कार्यक्रमाची भूमिका सांगीतली व महाव्यवस्थापक् श्रीमती.कोठारी मॅडम यांनी ,शासनाच्या योजना सागुण त्यांचा लाभ घेण्याचे अवाहन केले. तसेच एम. एस .एम. इ चे संचालक श्री. बारापत्रे यांनी प्रदर्शन व मेळावा यांचे महत्व विषद करून माहिती दिली. जिल्हा सुकाणू समितीचे सदस्य श्री. विकास जगताप यांनी मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांची ही योजना देशास देण्याची भूमिका सांगितली या कार्यक्रमात उद्घाटन पर भाषणामध्ये श्री. रवींद्र साठे, सभापती, खादी ग्रामोद्योग (महाराष्ट्र राज्य )यांनी प्रदर्शनातून शासनाचा उद्देश विषेद करून लोकल फॉर वोकल मधून विश्वकर्मा कारागीरांचा विकास व्हावा व देशातील वस्तूंना देशात व अंतराष्ट्रीय बाजारपेठ मिळवून देण्याचा हा उद्देश आहे. यासाठी विश्वकर्मानी जागरूक होऊन दर्जेदार वस्तु निर्माण करून स्वावलंबी कुटुंब करून विकास साधावा व आपले कलाकारी चे सामर्थ्यांचे या ठिकाणी दर्शन होत आहे .

ते ओपन मार्केट मध्ये ठेवून कलागुनाना वाव द्यावा असे सांगीतले व उद्योजक अंतराष्ट्रीय कसे निर्माण झाले व आपण कसे पुढील ध्येय साध्य कारायची या विषयाची जगातील उदाहरणे दिली व मा . पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला प्रथम स्टार्टप अप इंडिया नंतर मेक इन इंडिया, विश्वकर्मा या योजना निर्माण करून कारागीराच्या स्वप्नांना उभारी दिली आहे. त्यांचा फायदा हा जनतेनी घेऊन उत्तम उद्योजक होऊन देशसेवा केली पाहिजे.

# बांधकाम कामगारांनी एजंटांना बळी पडू नका - आ. खताळ

## आमदार खताळ यांच्या हस्ते दोन हजार बांधकाम कामगारांना भांडी वाटप

**संगमनेर : (समर्थ गांवकरी)**

संगमनेर तालुक्यात महायुती सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा बांधकाम कामगारांना लाभ देण्यात येत आहे. ही सर्व प्रक्रिया विनामूल्य राबविण्यात येत असून बांधकाम कामगारांनी कोणत्याही एजंटांना पैसे न देता थेट महायुती जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधून अर्ज भरून लाभ घ्यावा, असे आवाहन संगमनेरचे आमदार अमोल खताळ पाटील यांनी केले.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच वाटप करण्यात आले. त्यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राज्यातील महायुती सरकारच्या माध्यमातून विविध योजनांचे फॉर्म भरण्यासाठी काही ठिकाणी एजंटांकडून पैसे घेतले जात असून फसवणूक केल्याच्या तक्रारी येत आहेत. अशा प्रकारांना बळी न पडता नागरिकांनी आमदार अमोल खताळ पाटील जनसंपर्क कार्यालयाशी संपर्क साधून एक रुपयाही न देता योजनांचे अर्ज भरावेत, असे त्यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. कोणी पैसे मागत असल्यास किंवा अडवणूक करत असल्यास गुप्तपणे माहिती द्यावी संबंधितांवर फौजदारी कारवाई करण्यात येईल, असा इशाराही यावेळी आ. खताळ यांनी दिला.

केंद्र आणि राज्यात महायुतीचे सरकार असून संगमनेरात शिवसेनेचा आमदार असल्यामुळे विकासकामांमध्ये कोणतीही कमतरता भासू दिली जाणार नाही, असे सांगत आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांमध्ये




महायुती सरकारच्या पाठीशी भक्कम उभे राहण्याचे आवाहन आमदार खताळ यांनी उपस्थितांना केले. तसेच महायुती सरकाराच्या माध्यमातून लोककल्याणकारी योजनांचा लाभ देऊन सशक्त समाज निर्माण करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सुनेत्रा पवार आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील प्रयत्नशील असल्याचा विश्वास आमदार खताळ यांनी यावेळी व्यक्त केला.

संगमनेर शहरातील मातोश्री लॉन्स येथे पार पडलेल्या कार्यक्रमात शनिवार (१४ फेब्रुवारी) रोजी दोन हजार बांधकाम कामगारांना गृहपयोगी वस्तू संच देण्यात आले. तसेच यापुर्वी एकूण तेरा हजार बांधकाम कामगारांना आमदार अमोल खताळ यांच्या सहकार्याने संगमनेर येथे गृहपयोगी वस्तू संचाचे वाटप करण्यात आले आहे. याशिवाय विविध बांधकाम कामगार कल्याणकारी योजनेअंतर्गत संगमनेर तालुक्यातील ६१४४ लाभाचे प्रस्ताव अर्ज मंजूर करून ६ कोटी ३५ लाख ४ हजार रुपयांचे अर्थसहाय्य करण्यात आले असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर - ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे - ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)